स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका- प्रभाग रचनेपासून
(i) निवडणूक प्रक्रिया कर्तव्यदक्ष व नि:पक्ष अधिकारी/कर्मचारी यांच्याद्वारे हाताळण्याबाबत व
(ii) प्रतिबंधात्मक व इतर उपाययोजना करण्याबाबतचे आदेश सन-२०२५

सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.६/का-५
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : - १६ जुलै, २०२५

भारतीय संविधानातील तरतुदीनुसार ( २४३ के व २४३ झेडए ) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणामध्ये घेण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे. यासाठी राज्य निवडणूक आयोगाने खालील २ विषयांबाबतचे धोरण भारत निवडणूक आयोगाप्रमाणे सुरुवातीपासून स्विकारले आहे :-

i. निवडणूक प्रक्रिया कर्तव्यदक्ष व नि:पक्ष अधिकारी यांच्याद्वारे हाताळणे, व
ii. आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पोलीस व इतर विभागामार्फत प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे.

२. सध्याच्या पध्दतीप्रमाणे या दोन्ही विषयावर प्रत्यक्ष निवडणूक जाहीर झाल्यानंतर कार्यवाही सुरु करण्यात येते.

३. वरीलप्रमाणे कार्यवाही होत असली तरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या गेल्या काही वर्षात झालेल्या निवडणुकांमध्ये खालील बाबतीत अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत :-

i. प्रभाग रचना व मतदार यादी तयार करण्याच्यावेळी अधिकारी/कर्मचारी यांनी पक्षपातीपणा करणे, व
ii. निवडणुका जाहीर झाल्यानंतर सुरु करण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रत्यक्ष निवडणुकीपर्यंत अंतिम न होणे, इत्यादी.

४. वरील तक्रारींचा अभ्यास केल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, वरील धोरणांची ( निवडणूक प्रक्रिया कर्तव्यदक्ष व नि:पक्ष अधिकारी/कर्मचारी यांच्याद्वारे हाताळण्याबाबत व प्रतिबंधात्मक व इतर उपाययोजना करण्याबाबत ) अंमलबजावणी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या शेवटच्या टप्प्यात म्हणजेच निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून होत असल्याने निवडणुका पूर्णपणे निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यावर मर्यादा येतात.

५. लोकसभा/विधानसभा निवडणुकीमध्ये फक्त एकच टप्पा म्हणजे प्रत्यक्ष निवडणुका असतो मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये खालील ३ मुख्य टप्पे असतात.

i. प्रभाग रचना व आरक्षण.

ii. विधानसभा मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन व

iii. प्रत्यक्ष निवडणुका.

६. निवडणुकीचे विविध टप्पे व निवडणूक आयोगाच्या अधिकाराबाबत मा.सर्वोच्च न्यायालय यांनी Union of India Vs. Association of Democratic Reform and another यांचेतील प्रकरण क्रमांक अपिल (सिव्हील) 7178/2001 मध्ये पारित निकाल दि. 02/05/2002. यामध्ये खालीलप्रमाणे स्पष्टीकरण केलेले आहे. :-

> "The jurisdiction of the Election Commission is wide enough to include all power necessary for smooth conduct of elections and the word election is used in a wide sense to include entire process of election which consist of several stages and includes many steps"

७. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या वरील निकालावरुन स्पष्ट होत आहे की, निर्भय, मुक्त व पारदर्शक निवडणुकांसाठी वर नमूद केलेल्या दोन्ही धोरणांची अंमलबजावणी सध्याच्या पध्दतीप्रमाणे प्रत्यक्ष निवडणुकीपासून न करता प्रभाग रचना सुरु होण्यापासून करणे आवश्यक आहे.

८. मा. सर्वोच्च न्यायालयाचा वरील निकाल व इतर सर्व बाबींचा विचार करुन राज्य निवडणूक आयोगाकडून यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले क्र.रानिआ/मनपा-२०१८प्र.क्र.३०/का.५,

दि. ३१ जुलै, २०१८, दि. २३ फेब्रुवारी, २०२२ व दि. २८ फेब्रुवारी, २०२२ रोजीचे आदेश अधिक्रमित करुन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

## आदेश

### I. निवडणूक प्रक्रिया कर्तव्यदक्ष व नि:पक्ष अधिकारी यांच्याद्वारे हाताळण्याबाबत :-

१. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया ( प्रभाग रचना, विधानसभा मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन व प्रत्यक्ष निवडणुका ) कर्तव्यदक्ष, नि:पक्ष व सचोटी असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांमार्फतच राबविण्यात यावी.

२. शासनाचे संबंधित विभाग (उदा. सामान्य प्रशासन, गृह, नगर विकास, ग्राम विकास व महसूल इ.) व संबंधित नियंत्रण अधिकारी (उदा. पोलीस महासंचालक, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त इ.) यांनी शासनाने / राज्य निवडणूक आयोगाने, प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर केल्याबरोबरच विभाग/जिल्हा/तालुका स्तरावरील उपलब्ध अधिकारी/कर्मचारी यांचा आढावा घेऊन योग्य ते अधिकारीच नेमावेत.

३. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीशी थेट/प्रत्यक्ष संबंध असलेल्या अधिकाऱ्यांना प्रभाग रचना तयार करण्यास सुरूवात झालेल्या दिनांकास सध्याच्या पदावर ३ वर्ष पूर्ण होत असतील तर अशा अधिकाऱ्यांना निवडणूक निर्णय अधिकारी / सहायक निवडणूक निर्णय अधिकारी किंवा निवडणुकीशी संबंधित इतर कामासाठी नेमण्यात येऊ नये.

४. प्रत्यक्ष निवडणुकीशी संबंधित असेल अशा अधिकाऱ्यांची (उदा. निवडणूक निर्णय अधिकारी / सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, आचारसंहिता प्रमुख, मिडिया सेल इत्यादी) नेमणूक करताना खालील निकष पाळणे आवश्यक आहे:-

i. अ) महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायती निवडणुकीशी थेट संबंध

असलेल्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत सदर अधिकारी व त्यांचे पती/पत्नी यांची ते ज्या महानगरपालिका / नगरपरिषद प्रभाग क्षेत्रामधील कायम रहिवाशी आहेत, त्या प्रभागासाठी त्यांची नेमणूक करण्यात येऊ नये.

ब) जिल्हा परिषद / पंचायत समिती निवडणुकीशी थेट संबंध असलेल्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत सदर अधिकारी व त्यांचे पती/पत्नी यांची ते ज्या तालुक्यातील कायम रहिवाशी आहेत, त्या तालुक्यामध्ये त्यांची नेमणूक करण्यात येऊ नये.

उपरोक्त अ) व ब) मध्ये नमूद करण्यात आलेल्या "कायम रहिवाशी" निश्चित करण्यासाठी सदर अधिकारी यांच्या सेवा पुस्तकात नमूद केलेला कायम रहिवाशी पत्ता किंवा सदर अधिकारी यांनी घोषित केलेले स्वग्राम व स्वग्रामचा पत्ता हे ग्राह्य धरण्यात यावे. या दोन्ही पत्त्यापैकी एक पत्ता जर सदर प्रभाग / सदर तालुक्यात येत असेल तर अशा अधिकाऱ्यास सदर प्रभाग / सदर तालुक्यात नेमता येणार नाही.

ii. अ) त्याचप्रमाणे जे अधिकारी संपूर्ण महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायती निवडणुकीचे कामकाज पाहत असतील म्हणजेच ज्यांचा थेट/प्रत्यक्ष निवडणुकीशी संबंध येणार असेल (उदा. आचारसंहिता कक्ष प्रमुख, प्रसार माध्यम कक्ष प्रमुख इ.) तसे अधिकारी त्या महानगरपालिकेचे कायम रहिवाशी असू नयेत.

ब) त्याचप्रमाणे जे अधिकारी जिल्हा स्तरावरुन संपूर्ण जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे कामकाज पाहत असतील म्हणजेच ज्यांचा थेट/प्रत्यक्ष निवडणुकीशी संबंध येणार असेल (उदा. आचारसंहिता कक्ष प्रमुख, प्रसार माध्यम कक्ष प्रमुख इ.) तसे अधिकारी त्या जिल्ह्याचे कायम रहिवाशी असू नयेत.

iii. राज्याच्या मुख्य कार्यालयात उदा. मंत्रालय, विविध आयोग, संचालनालय इ. ठिकाणी कार्यरत असलेले अधिकारी/कर्मचारी यांना वरील निकष लागू राहणार नाहीत.

५. निवडणुकीच्या कामासाठी कर्तव्यदक्ष, नि:पक्ष अधिकारी/कर्मचारी यांची लौकीक व सचोटी (reputation & integrity) पाहून नियुक्ती करावी.

## II. प्रतिबंधात्मक व इतर उपाययोजना -

प्रभाग रचनेची सुरुवात झाल्यापासूनच पोलीस विभाग, उत्पादन शुल्क विभाग व इतर संबंधित विभागांनी सर्व प्रकारच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरु कराव्यात :-

१. निर्भय, मुक्त व पारदर्शकरितीने निवडणुका घेण्यामध्ये अडथळा येऊ शकेल अशा व्यक्तींची उदा. सराईत गुन्हेगार, गुंड प्रवृत्तीचे व्यक्ती, फरार घोषित करण्यात आलेले व परांगदा गुन्हेगार, संशयित व्यक्ती, जामीनावर सुटका केलेले अथवा पॅरोलवर असलेले व तत्सम इत्यादीची यादी तयार करुन त्यांच्यावर भारतीय न्याय संहिता, २०२३ अन्वये आवश्यक कारवाई करण्यात यावी. यामध्ये प्रतिबंधात्मक कारवाई करणे, पॅरोल व जामीनावर सुटलेल्या व्यक्ती जामीनाच्या अटी, शर्तींचे पालन करतात काय यावर लक्ष ठेवणे, चांगल्या वर्तणुकीसाठी बंधपत्र लिहून घेणे, आवश्यक कार्यपध्दतीचा अवलंब करुन त्यांना तडीपार करणे, इ. प्रकारच्या कारवाईचा समावेश असू शकेल.

२. विविध न्यायालयांनी व प्राधिकरणांनी जारी केलेले वॉरंट/समन्स बजावून कायद्यातील तरतुदीप्रमाणे पुढील कार्यवाही करणे.

३. मुंबई दारुबंदी अधिनियम १९४९ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार विनापरवाना किंवा अवैधरित्या दारु तयार करणारे यासोबतच विनापरवाना विक्री करणाऱ्यांवर धाडी घालणे, मतदानाच्या आदल्या दिवशी, मतदानाच्या दिवशी व मतमोजणीच्या दिवशी अवैध दारु विक्री होणार नाही याकरीता योग्य त्या

उपाययोजना करणे, सदर अधिनियमांतर्गत दाखल असलेल्या व निकाली न निघालेल्या सर्व प्रकारच्या प्रकरणांचा पाठपुरावा करणे, त्यामधील अपचारी यांना कायद्यातील तरतुदीनुसार शिक्षा होण्यासाठी पाठपुरावा करणे इ.

४. यापूर्वी झालेल्या निवडणुकीत, दाखल झालेल्या प्रलंबित निवडणूक संबंधी गुन्ह्यांचा/दाव्यांचा पाठपुरावा करणे, इत्यादी.

५. निवडणुका जाहीर झाल्यापासून शस्त्रास्त्रे बाळगण्यास बंदी राहील. ही बंदी निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत शस्त्र अधिनियम १९५९ अन्वये आवश्यक त्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन अंमलात आणावी.

निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शकरित्या पार पाडल्या जाव्यात यादृष्टीने वरील सर्व बाबींवर कार्यवाही करण्यासाठी उपरोक्त नमूद I व II अंतर्गत सर्व विषयाबाबतची कार्यवाही निवडणुकीची अधिसूचना निर्गमित होण्यापूर्वी नमूद कायद्यातील तरतुदीनुसार पूर्ण होईल याची दक्षता घेण्यात यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

१८.०७.२०२५

( सुरेश काकाणी )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१) मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
२) अप्पर मुख्य सचिव (गृह) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
३) अप्पर मुख्य सचिव (महसूल) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
४) प्रधान सचिव (२) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
५) प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
६) सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई -३२.
७) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) सर्व जिल्हाधिकारी.
९) सर्व महानगरपालिका आयुक्त.
१०) सर्व निवडणूक कार्यासने, राज्य निवडणूक आयोग.
११) निवड नस्ती.